नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - २३२<br>Issue - 232 | वार रविवार दि. ११ जानेवारी २०२६<br>Blow- Sunday Date 11 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# सोलापूरकरांना दररोज पाणी देण्याचा माझा शब्द

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सोलापूरकरांना अभिवचन : हजारोंच्या गर्दीत झाली उत्साही विजय संकल्प सभा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर / प्रतिनिधी

सोलापूर शहराची लोकसंख्या २०५७ जितकी असेल त्या लोकसंख्येला पुरेल इतके पाणी दररोज देण्याचे नियोजन पूर्ण झाले आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेवर भाजपचा महापौर झाल्यानंतर काही काळातच सोलापूरकरांना दररोज पिण्याचे पाणी देण्याचा शब्द मी देत आहे, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी सोलापूरकरांना अभिवचन दिले. हजारो सोलापूरकरांच्या गर्दीत शनिवारी हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भव्य विजय संकल्प सभा झाली.

यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, आमदार समाधान अवताडे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी आमदार नरसिंग मेंगजी, भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष (पूर्व) शशिकांत चव्हाण, जिल्हाध्यक्ष (पश्चिम) चेतनसिंह केदार, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, सरचिटणीस सुधा अळीमोरे, डॉ. शिवराज सरतापे, पांडुरंग दिड्डी, प्रा. मोहिनी पत्की, उपाध्यक्ष मोहन डांगरे श्रीनिवास दायमा, रुद्रेश बोरामणी, अंबादास बिंगी, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विजय कुलथे, डॉ. आदर्श मेहता, कुमुद अंकाराम, ॲड. साधना संगवे, लक्ष्मण गायकवाड, श्रीनिवास दासरी, देविदास बनसोडे, देविदास जंगम, देवेंद्र भंडारे उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सोलापूर शहराला दररोज पाणी मिळण्यासाठी ८९२ कोटी रुपये निधीची योजना लवकरात लवकर पूर्ण करणे, सोलापूर शहरातील चाळींच्या पुनर्विकासाला चालना देणे, संपूर्ण शहरासाठी पिण्याचे पाणी, मलनिस्सारण प्रकल्प करणे,आवास योजनापूर्ती, अक्कलकोट रस्ता आणि होटगी रस्ता एमआयडीसीतील सुविधांची पूर्तता यासाठी भाजप प्रयत्नशील आहे.

सोलापूरकरांचा भाजपावर प्रचंड विश्वास आहे. मध्यमवर्गीयांच्या, सामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी सोलापूरचे चित्र बदलण्याकरता भाजप काम करत राहणार आहे. जिथे विमानसेवा सुरू होते तिथे उद्योग व्यापार आणि पर्यायाने रोजगार मोठ्या प्रमाणावर निर्माण होतो. सोलापूर या औद्योगिक नगरीला भरभराट आणण्यासाठी विमानसेवा भाजपा सरकारने सुरू केली आहे. आगामी काळात सोलापूर विमानतळावर नाईट लँडिंगचीही सुविधा देण्यात येणार आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सोलापूरची विमानसेवा सुरू होणार नाही असे काही जण म्हणत असत. परंतु भाजपाने विमानसेवा सुरू करून दाखवली असेही त्यांनी सांगितले.

सोलापूरची ओळख चादर, कडक भाकरी, हुरडा, शेंगा चटणी जशी आहे त्याचसोबत सोलापूरला आधुनिक शहराची ओळख मिळवून देण्याचे आमचे स्वप्न आहे. सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) शहरांचा ६५ टक्के वाटा आहे. परंतु गेल्या ७० वर्षांमध्ये शहराच्या सुधारणांकडे दुर्लक्ष करण्यात आले. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर शहर सुधारण्याकडे देशाचे लक्ष वेधत शहरांच्या सुधारणेला प्राधान्य दिले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींचे सोलापूरवर विशेष प्रेम आहे. त्यांनी सोलापूरसाठी नाशिक - सोलापूर - अक्कलकोट असा महामार्ग मंजूर केला आहे. हा रस्ता थेट देशातील सर्वात मोठे बंदर असलेल्या वाढवण बंदराला जोडत असल्यामुळे या परिसरात औद्योगीकरणाकरता नवी इकोसिस्टीम तयार होणार आहे. तसेच हा रस्ता मुंबई - दिल्ली महामार्गालाही जोडण्यात येणार आहे. त्यामुळे सोलापूरच्या विकासाची गती वाढणार आहे.

सोलापूर हे यंत्रमाग, विडी कामगार, विणकर आणि कामगारांचे शहर आहे. सोलापूरकरांच्या योगदानातून येथील अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. सोलापुरातील यंत्रमाग उद्योगाला उभारी देण्यासाठी इचलकरंजी पॅटर्न राबविण्यात येणार आहे. सोलापूरच्या परिसरात श्री सिद्धरामेश्वरांसह अक्कलकोट, पंढरपूर, तुळजापूर, गाणगापूर आदी तीर्थक्षेत्रे असल्यामुळे भविष्यात सोलापूर हे पर्यटनाचे इंजिन म्हणून काम करणार आहे. कमळ हे लक्ष्मीचे वाहन असून समृद्धीचे प्रतीक आहे. सोलापूरकरांनी १५ जानेवारीला कमळाची काळजी घ्यावी. १६ जानेवारीपासून तुमची काळजी देवाभाऊ घेईल असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरकरांना आश्वस्त केले.

### रोज पाणी दिल्याशिवाय मत मागायला येणार नाही

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरला दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी ८९२ कोटी रुपयांची महत्त्वकांक्षी योजना मंजूर केली आहे. ही योजना पूर्णत्वास नेण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे संपूर्ण पाठबळ सोलापूरला आहे. त्यामुळे ही योजना लवकरच पूर्णत्वास येणार आहे. सोलापूरला दररोज पाणी दिल्याशिवाय पुन्हा मते मागायला येणार नाही, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी ठामपणे सांगितले.**

### महापौर भाजपचाच होणार

**सोलापूरने आजवर ज्या ज्या योजना, प्रकल्प, निधी मागितले ते सर्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले आहे. सोलापूरचा चौफेर विकास होत आहे. सोलापूरचे भविष्य ठरविणारी ही निवडणूक आहे. त्यामुळे सोलापुरातील सर्व लाडक्या बहिणींसह सर्व सोलापूरकरांनी भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी उभे रहावे, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याप्रसंगी केले.**

# मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील घाटात तीव्र उतारावर भरधाव ट्रकची धडक, तब्बल सात वाहनांचा चेंदामेंदा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदूर : इंदूरमधील महू येथे सात वाहनांची टक्कर झाली. एक पीक अप आणि गॅस टँकर गाड्यांवर आदळला. शनिवारी सकाळी मानपूर भेरू घाटावर हा अपघात झाला. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, ज्या घाटात हा अपघात झाला तो भाग सुमारे दोन किलोमीटरचा तीव्र उताराचा आहे. एका वेगाने येणाऱ्या ट्रकने उतारावरून जात असताना नियंत्रण गमावले आणि समोरील आयशरला धडक दिली. आयशरला धडक बसली आणि नंतर समोरील कारला धडक बसली. एक कार आणि पिकअपची टक्कर झाली. मानपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी लोकेंद्र हेहोर यांनी सांगितले की, वाहनांची टक्कर झाली. यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

इंदूरहून हैदराबादला जाणारा ट्रक चालक मोहम्मद आरिफने सांगितले की, वाहनाचे ब्रेक निकामी झाले. एका बाजूला वाहतूक कोंडी झाली होती. एका बाजूला कार आणि मुले होती. त्यामुळे ट्रक दुसऱ्या बाजूला वळला आणि ट्रेलरला धडकला. आम्ही स्वतःला आणि जनतेला वाचवले, तो म्हणाला.



राजस्थानमधील कार चालक रघुवीर म्हणाला की, दोन्ही लेनमध्ये वाहतूक कोंडी होती. आम्ही वाहतूक कोंडीत उभे होतो. दुसऱ्या लेनमधून एक भरलेला ट्रक आला आणि पिकअप ट्रकला धडकला, जो उलटला आणि कारवर पडला. कारमध्ये आम्ही दोघे होतो. आम्ही दोघेही सुरक्षित आहोत.

दुसऱ्या कारमधील प्रवासी जयदीप म्हणाला, मी उज्जैनहून त्र्यंबकेश्वरला भेट देण्यासाठी जात होतो. पुढे वाहतूक कोंडी झाली होती. मी थांबताच मी सर्व्हिस लेनवर गाडी थांबवली. जेमतेम दोन मिनिटे झाली होती की माझी गाडी मागून धडकली आणि त्यानंतर समोरील वाहनांशी टक्कर झाली. ट्रक नियंत्रणाबाहेर गेला आणि सर्व वाहनांना धडकला. माझ्या गाडीत चार मुलांसह आठ लोक होते. सर्वजण सुरक्षित आहेत. कोणीही जखमी झाले नाही. आमच्या गाडीचे एअरबॅग्ज उघडल्यामुळे आम्ही सर्व सुरक्षित आहोत.

# ९ आसनी चार्टर्ड विमान कोसळले, पायलटसह ६ जण गंभीर जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भुवनेश्वरहून ओडिशातील राउरकेला येथे उड्डाण करणारे नऊ आसनी इंडिया वन एअरचे विमान शनिवारी दुपारी लँडिंग दरम्यान कोसळले. या अपघातात सहा जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. राउरकेला येथील रघुनाथपल्ली परिसरातील झुला ए ब्लॉकजवळ हे विमान कोसळले. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार मोठी दुर्घटना टळली आहे. विमानातील सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे वाचवण्यात आले. इंडिया वन एअरलाइन्सच्या विमानाने दुपारी १:३० वाजता काटीबंधा कंसाराजवळील एका शेतात आपत्कालीन लँडिंग केले. चार प्रवासी आणि दोन पायलट असलेले सिंगल-इंजिन विमान सुमारे चार ते पाच किलोमीटर उड्डाण केल्यानंतर तांत्रिक बिघाड झाला, ज्यामुळे पायलटला विमान क्रॅश-लँडिंग करावे लागले. घटनास्थळी पोहोचलेल्या अग्निशमन विभागाच्या पथकाच्या म्हणण्यानुसार, सुंदरगड जिल्ह्यातील राउरकेला येथील कंसारा येथे एक छोटे खासगी विमान कोसळले, ज्यामुळे प्रवासी आत अडकले. माहिती मिळताच, राउरकेला अग्निशमन केंद्र आणि पानपोश अग्निशमन केंद्रातील अग्निशमन दलाच्या गाड्या जखमींना वाचवण्यासाठी घटनास्थळी पोहोचल्या. घटनेनंतर, जखमींना वाचवण्यात आले आणि उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. विमान राउरकेलाहून भुवनेश्वरला जात असताना ही घटना घडली. ओडिशाचे वाणिज्य आणि वाहतूक मंत्री बी.बी. जेना यांनी सांगितले की, ए-१ श्रेणीतील खासगी विमान अपघातात कोसळले. त्यात पायलटसह सहा जण होते. सर्व जखमी झाले आहेत आणि त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर आहे. डीजीसीएला घटनेची माहिती देण्यात आली आहे. अनिता साहू, सुनील अग्रवाल, सविता अग्रवाल, सुशांत कुमार बिस्वाल, पायलट- तरुण श्रीवास्तव, नवीन खंगार

### शहीद नायक वैभव लहाने यांना अकोल्यात मानवंदना

### संपूर्ण जिल्ह्यात शोककळा

# कुपवाड्यातील दहशतवाद विरोधी कारवाईत महाराष्ट्राच्या शूर जवानाला वीरमरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोला : अकोला जिल्ह्यातील सेवारत सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने या शूर जवानाचं नाव आज कायमच इतिहासात कोरलं गेलंय. जम्मू काश्मिरमध्ये कुपवाडा सेक्टरमध्ये कार्यरत असलेल्या नायक वैभव लहाने या शूरवीराने मातृभूमीसाठी आणि तिरंग्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे.

भारतीय सेनेतील १२ मराठा लाईट इन्फंट्री तुकडीत कार्यरत असताना दहशतवाद विरोधी (काउंटर इन्सर्जन्सी) कारवाई दरम्यान नायक वैभव लहाने यांना वीरमरण आले आहे. जम्मू - काश्मीर मधील कुपवाडा सेक्टर येथे कर्तव्यावर असताना ७ जानेवारी रोजी त्यांना हे वीरमरण आलेय. अकोल्याचा सुपूत्राच्या या वीरमरणाच्या बातमीने संपूर्ण जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.

देशसेवेत कर्तव्य बजावत असताना अकोला जिल्ह्यातील सेवारत सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने यांना वीरमरण आले. ते १२ मराठा लाइट इन्फंट्री या युनिटमध्ये कार्यरत होते. शहिद लहाने हे जम्मू काश्मिरमध्ये कुपवाडा सेक्टरमध्ये कार्यरत होते. दि. ७ जानेवारीला ते शहीद झाले. त्यांचे मूळ गाव कपिलेश्वर आहेय. त्यांचे पार्थिव ९ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास कपिलेश्वर येथे पोहोचले. तिथे त्यांना मानवंदना देऊन त्यांच्या मूळगावी सैनिकी व शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सैनिकांनी मानवंदना देत पोलीस विभागाच्या वतीने बंदुकीच्या ३ फैरी झाडून सलामी दिली. यावेळी 'शहीद जवान अमर रहे', 'भारत माता की जय'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. तसेच संपूर्ण गावकऱ्यांच्या डोळ्याच्या कडा पाणावलेल्या होत्या. नायक लहाने यांच्या वीरमरणाच्या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.





शहीद वैभव लहाने यांचे मूळ गाव कपिलेश्वर (पो. वडद, ता. अकोला) असून, सध्या त्यांचे कुटुंब श्री गजानन नगरी, कौलखेड येथे वास्तव्यास होते. ते दोन भावंडांपैकी मोठे होते तर त्यांचे धाकटे बंधू राजू लहाने हे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात जवान म्हणून देशसेवेत कार्यरत आहेत.

एकाच कुटुंबातील दोन जवान देशाच्या सेवेत असल्याने लहाने कुटुंबाचा देशाभिमान अधिकच अधोरेखित झाला आहे. नायक वैभव लहाने यांच्या या वीरमरणामुळे अकोला जिल्हा शोकसागरात बुडालाय. शिवाय त्यांच्या बलिदानाचा अभिमान प्रत्येक भारतीयाच्या मनात सदैव जिवंत राहील.

त्यांच्या त्यागामुळेच देश सुरक्षित आहे, ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात अधिक दृढ झाली आहे. अशा वीर जवानांचे ऋण देश कधीही विसरू शकणार नाही. अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

# मानवी तस्करी : आधुनिक गुलामगिरीविरुद्ध माणुसकीचा लढा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी ११ जानेवारी रोजी साजरा होणारा 'राष्ट्रीय मानवी तस्करी जागरूकता दिन' हा केवळ एखादा स्मरणदिन नसून तो समाजाच्या सामूहिक अंतरात्म्याला जागे करणारा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. स्वातंत्र्य, समानता आणि मानवी हक्क यांची मूल्ये जपत पुढे चालणाऱ्या आधुनिक जगात आजही लाखो स्त्री–पुरुष आणि मुले खरेदी–विक्रीच्या वस्तूसारखी वागवली जातात, ही बाब आपल्या सामाजिक प्रगतीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करते. मानवी तस्करी ही काही गुन्हेगारांची विकृती नसून ती दारिद्र्य, विषमता, बेरोजगारी, स्थलांतर, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक असुरक्षितता या सर्व घटकांच्या परस्पर संबंधातून निर्माण झालेली खोलवर रुजलेली सामाजिक समस्या आहे. म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ गुन्हेगारी स्वरूपात न पाहता समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

मानवी तस्करी म्हणजे एखाद्या व्यक्तीला फसवणूक, आमिष, धमकी, दबाव किंवा हिंसेच्या माध्यमातून तिच्या इच्छेविरुद्ध एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेऊन तिच्याकडून शोषणात्मक काम करून घेणे. हे शोषण लैंगिक असू शकते, जबरदस्तीची मजुरी असू शकते, घरगुती गुलामगिरी, बालमजुरी, भीक मागणे, अवयव विक्री किंवा सक्तीच्या विवाहाच्या स्वरूपातही ते आढळते. या प्रक्रियेत माणसाचे स्वातंत्र्य, ओळख आणि मानवी प्रतिष्ठा पूर्णपणे नष्ट होते. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की ज्या समाजात सत्ता, संसाधने आणि संधी काही मोजक्या गटांकडे केंद्रीत असतात, तिथे दुर्बल घटकांचे शोषण अपरिहार्यपणे वाढते आणि मानवी तस्करीसारख्या अमानवी प्रथा बळावतात.

भारतीय समाजरचना ही ऐतिहासिकदृष्ट्या जात, वर्ग, लिंग आणि प्रदेश यांच्या आधारे विभागलेली आहे. या विषम सामाजिक रचनेमुळे अनेकांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या समान संधी मिळत नाहीत. ग्रामीण भागातील दारिद्र्य, शेतीतील अनिश्चित उत्पन्न, आदिवासी भागातील विकासाचा अभाव आणि शहरी झोपडपट्ट्यांतील असुरक्षित जीवन यामुळे लाखो लोक रोजीरोटीच्या शोधात स्थलांतर करतात. या स्थलांतराच्या प्रवासातच दलाल आणि तस्कर गरीब व असहाय लोकांना चांगल्या नोकरीचे, शिक्षणाचे किंवा सुरक्षित आयुष्याचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढतात. विशेषतः महिला, मुले, आदिवासी आणि स्थलांतरित कामगार यांच्याकडे माहिती, कायदेशीर संरक्षण आणि सामाजिक पाठबळ कमी असल्याने ते अधिक असुरक्षित ठरतात.

स्त्री आणि मुलींची तस्करी ही मानवी तस्करीचे सर्वात क्रूर रूप मानले जाते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीच्या शरीराकडे आणि श्रमाकडे वस्तू म्हणून पाहण्याची प्रवृत्ती अजूनही खोलवर रुजलेली आहे. याच मानसिकतेतून लैंगिक तस्करीला खतपाणी मिळते. अनेक मुली प्रेमजाळे, खोटी लग्ने, नोकरीचे आमिष किंवा थेट अपहरणाद्वारे वेश्याव्यवसायात ढकलल्या जातात. त्यांच्या आयुष्यावर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पातळीवर खोल जखमा उमटतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही केवळ काही गुन्हेगारांची कृत्ये नसून स्त्रीला दुय्यम स्थान देणाऱ्या सांस्कृतिक रचनेचे अपयश आहे.

बाल तस्करी ही तर समाजाच्या नैतिक अधःपतनाची परिसीमा आहे. शिक्षण, संरक्षण आणि प्रेमाचा हक्क असलेल्या मुलांना बालमजुरी, भीक मागणे, घरगुती कामे किंवा लैंगिक शोषणासाठी वापरले जाते. अनेक वेळा अत्यंत गरीब कुटुंबेही आपल्या असहायतेमुळे दलालांच्या फसवणुकीला बळी पडतात. समाजशास्त्र सांगते की मुलांचे शोषण हे सामाजिक सुरक्षा जाळ्याच्या अपयशाचे द्योतक आहे. जेव्हा राज्य आणि समाज कुटुंबांना मूलभूत सुविधा पुरवण्यात अपयशी ठरतात, तेव्हा मुले तस्करीच्या जाळ्यात अडकतात.

कामगार तस्करी आणि जबरदस्तीच्या श्रमांची समस्या ही आधुनिक भांडवली अर्थव्यवस्थेची काळी बाजू आहे. असंघटित क्षेत्रात काम करणारे लाखो कामगार कर्ज, आमिष किंवा फसवणुकीमुळे गुलामासारखे राबवले जातात. वीटभट्ट्या, बांधकाम, शेती, कारखाने आणि घरगुती कामांमध्ये त्यांना अत्यंत अमानुष परिस्थितीत काम करावे लागते. जागतिकीकरणामुळे स्वस्त श्रमांची मागणी वाढली असून त्याचा फायदा तस्कर घेतात. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे आर्थिक विषमतेचे आणि कामगारांच्या दुर्बलतेचे द्योतक आहे.

डिजिटल युगात मानवी तस्करीचे स्वरूपही बदलले आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन जाहिराती आणि बनावट भरती संस्थांच्या माध्यमातून तरुणांना नोकरी, मॉडेलिंग किंवा परदेशी शिक्षणाचे आमिष दाखवले जाते आणि नंतर त्यांचे शोषण केले जाते. त्यामुळे आज जागरूकता ही केवळ भौतिक जगापुरती मर्यादित न राहता डिजिटल अवकाशातही तितकीच महत्त्वाची आहे. माहितीची असमानता आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर हे नव्या प्रकारच्या सामाजिक शोषणाचे माध्यम ठरत आहेत.

भारतात मानवी तस्करीविरोधात कायदे आणि योजना अस्तित्वात असल्या तरी अंमलबजावणीतील त्रुटी मोठे आव्हान ठरतात. पोलिस, न्यायव्यवस्था आणि सामाजिक संस्थांमध्ये समन्वयाचा अभाव, तसेच पीडितांविषयी असलेला सामाजिक कलंक, पुनर्वसनाच्या प्रक्रियेला अडथळा आणतो. तस्करीतून सुटलेल्या व्यक्तींना समाजात पुन्हा स्वीकार मिळणे कठीण जाते, आणि त्यामुळे अनेकदा ते पुन्हा शोषणाच्या चक्रात अडकतात.



या सर्व पार्श्वभूमीवर राष्ट्रीय मानवी तस्करी जागरूकता दिनाचे महत्त्व अधिक ठळक होते. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की मानवी प्रतिष्ठेचे रक्षण ही केवळ सरकारची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. गरिबी निर्मूलन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि कामगार हक्कांचे संरक्षण ही मानवी तस्करीविरोधातील सर्वात प्रभावी साधने आहेत. शाळा, महाविद्यालये, प्रसारमाध्यमे आणि स्वयंसेवी संस्था यांनी या विषयावर सातत्याने जनजागृती करणे आवश्यक आहे.

समाजशास्त्र आपल्याला शिकवते की मानवी तस्करी ही वेगळी समस्या नसून ती आपल्या सामाजिक रचनेतील दोषांचे प्रतिबिंब आहे. म्हणून तिचे उच्चाटन करायचे असेल तर आपल्याला अधिक समतावादी, संवेदनशील आणि न्याय्य समाज घडवावा लागेल. ११ जानेवारी हा दिवस आपल्याला केवळ जागरूक करत नाही, तर कृतीसाठी प्रेरित करतो. कारण ज्या समाजात माणूस माल म्हणून विकला जातो, त्या समाजात कोणाच्याही स्वातंत्र्याला अर्थ राहत नाही. मानवी तस्करीविरुद्धची लढाई म्हणजे माणुसकीच्या रक्षणाची लढाई आहे, आणि ती आपणा सर्वांची आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**
**ईमेल –** bagate.rajendra5@gmail.com

# आदिवासी भागातील आरोग्य सुविधा बळकटीकरणास प्राधान्य द्यावे : आरोग्यमंत्री



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील आदिवासी व दुर्गम भागातील आरोग्यसेवा अधिक बळकट करण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत.

आरोग्यमंत्री आबिटकर यांनी नुकत्याच अमरावती, मेळघाट, अकोला, जळगाव, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथील विविध आरोग्य संस्थांना भेटी दिल्या होत्या, या भेटीदरम्यान त्यांनी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची आढावा बैठक मंत्रालयातील समिती सभागृहात झाली. बैठकीला आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्यसेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत, डॉ. सरिता हजारे उपस्थित होते. संचालक डॉ. विजय कंदेवाड तसेच आदिवासीबहुल भागातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. आदिवासी बहुल सर्व जिल्ह्यात आरोग्य तपासणीचे विशेष कॅम्प आयोजित करावेत. अमरावती जिल्ह्यातील 'धारणी' येथील आरोग्य संस्थेचे श्रेणीवर्धन करावे. रिक्त जागा भरण्याची कार्यवाही तातडीने करावी. सर्व आरोग्य संस्थांमध्ये स्वछता ठेवावी व उत्तम आहार व्यवस्था चांगली करावी, असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी यावेळी दिले. मेळघाटातील नेमिया निर्मूलन मोहीम, सिकलसेल तपासणी मोहीम अधिक प्रभाविपणे राबवावी. तसेच ग्रामविकास विभागाशी संबंधित पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाहीचे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

# सिन्नर महापालिकेतील शिवसेना उ.बा.ठा. गटाच्या नगरसेवकपदी रणरागिनी अंबिका धनगर यांची निवड; डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या तर्फे सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक/प्रतिनिधी : राज्यातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील सिन्नर महानगरपालिकेच्या नगरसेवकपदी शिवसेना (उबाठा) गटाच्या वतीने रणरागिनी सौ. अंबिका धनगर यांची निवड झाल्याबद्दल विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्या युवा नेते तथा खासदार राजाभाऊ गोडसे यांचे विश्वसनीय समर्थक लोकेश दादा धनगर यांच्या सुविद्य पत्नी आहेत.

या निवडीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सौ. अंबिका धनगर यांचा श्रीफळ, साईबाबा मूर्ती, खोबरे–खारीक हार, शाल देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, नामवंत उद्योजक दौलतशेठ धनगर आदी मान्यवर उपस्थित होते.

सत्कारप्रसंगी बोलताना डॉ. आरोटे यांनी सौ. अंबिका धनगर यांच्या सामाजिक जाणिवा, कार्यतत्परता व लोकाभिमुख नेतृत्वगुणांचा उल्लेख करत सिन्नर शहराच्या विकासासाठी त्या प्रभावी भूमिका बजावतील, असा विश्वास व्यक्त केला.

सिन्नर महापालिकेतील ही निवड शिवसेना (उबाठा) गटासाठी बळकटी देणारी ठरेल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# विमानतळासारखी सुरक्षा आता रेल्वे स्थानकावर; वाढत्या धमक्यांनंतर सीएसएमटीवर कडक निर्बंध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई येथील मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) वर मेल व एक्सप्रेस प्रवाशांसाठी बॅगेज तपासणी अनिवार्य करण्यात आली आहे. याठिकाणी सुरक्षा अधिकारी बॅगेज स्कॅनरद्वारे सामानाची तपासणी करतील आणि तपासणी न झालेल्या प्रवाशांना टर्मिनसमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. तसेच, विमानतळासारखी सुविधा सुरु करून, तपासणी पूर्ण झालेल्या बॅगवर स्टिकर लावण्याची पद्धत लागू करण्यात आली आहे.

सीएसएमटी हे मध्य रेल्वेचे मुंबईतील प्रमुख टर्मिनस असून, येथे दररोज शेकडो मेल व एक्सप्रेस गाड्या सुटतात. मात्र, यापूर्वी सुरक्षा उपाय अपुरे असल्यामुळे प्रवाशांचे सामान नियमित तपासले जात नव्हते. अनेक वेळा ही समस्या प्रसार माध्यमाने निदर्शनास आणून दिली होती. रेल्वे प्रशासनाने याची दखल घेत काही दिवसांपूर्वी मुख्य प्रवेशद्वारावर दोन



बॅगेज स्कॅनर बसवले आहेत.

सुरक्षेच्या उपाययोजनांमध्ये, लोकलच्या प्लॅटफॉर्मवरून आणि तिकीट काउंटरकडून एक्सप्रेसच्या प्लॅटफॉर्मकडे जाणाऱ्या सर्व प्रवेशद्वारांवर बॅरिकेड्स लावले गेले आहेत. या नव्या उपाययोजनांमुळे बॅगची तपासणी पूर्ण झाल्यानंतरच प्रवाशांना प्लॅटफॉर्मवर प्रवेश मिळेल, ज्यामुळे टर्मिनसवर प्रवाशांची सुरक्षितता वाढणार आहे.

रेल्वे अधिकाऱ्यांच्या मते, प्रवाशांना वैध तिकीट देणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्यांच्या बॅगेजची तपासणी करणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या बॅगमधून कपड्यांव्यतिरिक्त कोणतीही संशयास्पद वस्तू नेली जात नाही, हे सुनिश्चित करणे ही सुरक्षेच्या दृष्टीने गरजेची बाब आहे. तसेच, क्लॉक रूममध्ये ठेवण्यात येणाऱ्या सामानाचीही तपासणी केली जात आहे, ज्यामुळे टर्मिनस परिसरातील सुरक्षा बळकट होईल.

रेल्वे प्रशासनाचे म्हणणे आहे की, ही पद्धत सीएसएमटीवर सुरक्षेला उच्च दर्जा देण्याच्या उद्देशाने लागू करण्यात आली आहे. बॅगेज स्कॅनिंगसह स्टिकर पद्धतीमुळे प्रवाशांना त्यांच्या सामानाची तपासणी पूर्ण झाल्याचे तत्काळ कळते आणि सुरक्षा अधिक प्रभावी बनते.

या उपाययोजनांमुळे सीएसएमटी टर्मिनसवर प्रवाशांचा विश्वास वाढेल, प्रवास अधिक सुरक्षित होईल आणि मेल–एक्सप्रेस गाड्यांवरील प्रवाशांसाठी सुविधा सुधारेल. भविष्यात हे नियम आणखी विकसित करून मुंबईतील महत्त्वाच्या टर्मिनसवर प्रवाशांच्या सुरक्षेला अधिक बळकटी दिली जाईल, अशी रेल्वे प्रशासनाची माहिती आहे.

**नळदुर्ग पोलीसांच्या या कामगिरी बदल ग्रामस्यातून समाधान**

**पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून दोन आरोपींना केले गजाआड**

# नळदुर्ग पोलिसांच्या सतर्कतेमुळे चोरीस गेलेला वागदरी येथील शेतकऱ्यांचा मुद्देमाल मिळाला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : नळदुर्ग पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील पत्र्याचे शेडच्या दरवाजाचे कुलूप तोडून शेडमध्ये नुकतच रास करून ठेवलेले तुरीचे सात ते आठ पाकीट व गॅस सिलेंडर भांडी संसार उपयोगी वस्तू त्याचप्रमाणे एका दुसऱ्या शेतकऱ्याच्या शेतातील म्हैस रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरटे मालवाहतूक पिकप मध्ये घेऊन चोरून नेत असल्याचे नळदुर्ग पोलीसांच्या लक्षात येताच त्यानी त्यांच्यावर पोलीस चौकशी पद्धतीनीने पोलीस निरिक्षक सचिन यादव यांच्या मार्ग दर्शनाखाली दिवसभर अंकूश ठेवून शेतकऱ्याचा चौरीर गेलेल्या मुदेमाला सह माल वहातुक पिकप (टेम्पो ) हस्तगत करून दोन आरोपीना गजाआड केले.

एका चित्रपटाला शोभेल असी ही घाटना असून नळुदुर्ग पोलीसांच्या या कामगिरी बदल ग्रामस्थातून समाधान व्यक्त केले जात आहे.

या बाबत माहिती असी की दि. ८ जानेवारी २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील शेतकरी सौ.शिक्षाबाई रमेश जेटीथोर यांच्या वागदरी व गुजनूर शिव लगत असलेल्या शेतातील पत्र्याच्या शेडचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने शेडमध्ये नुकतच रास करून ठेवलेले तुरीचे सात–आठ गोणी व गॅस सिलेंडर,भांडे काही संसार उपयोगी.वस्तू चोरून नेले त्याच प्रमाणे वागदरी येथील शेतकरी श्री फत्तेसिंग ठाकूर यांच्या शेतात बांधलेली एक म्हैस पिकप (टेम्पो) मध्ये घालून नळदुर्ग मार्गे लातूरकडे जात असताना नळदुर्ग येथील गोलाई मध्ये नळदुर्ग पोलीस ठाण्याये बिट अमलदार एन.सी. चाबुकस्वार आपल्या पोलिसांचे गस्त पथका २ रुट पोलीग गाडी सह थांबली होते. त्यांच्या लक्षात आले की सदर या पिकप टेम्पो मधून .चोरीचा माल जात असावा या अंदाजाने ती गाडी थांबवून चौकशी केली असता गाडीतील इसमानी व चालकांनी त्यांना सदर माल हा हंगरगा नळ तालुका तुळजापूर येथील पाहुण्याचा असून घरगुती सामान आहे ते आम्ही लातूरकडे घेऊन जात आहोत असे खोटे सांग'ली.संबंधित हंगरगा येथील इसमानाही फोन केला असता त्यांनीही तो माल आमचाच आहे.ते आमचे पाहुणे आहेत असे सांगितले तरीही संशयाची पाल पोलिसांच्या मनात चुक चुकत होते म्हणून त्यांनी सतर्कतेने त्या वाहनातील इसम व.चालक यांचेआधार कार्ड,फोन नंबर आणि गाडीच्या आर. सी. बुक चे फोटो काढून घेतले आणि त्यांना तंबी दिली की गरज पडली तर तुम्हाला नळदुर्ग पोलीस स्टेशनला यावं लागेल.. या अटीवर त्यांनी त्यांना रात्री सोडून दिले. सकाळी सातच्या दरम्यान नळदुर्ग पोलीस स्टेशनला शेतकऱ्याची तोंडी तक्रार गेली की आमच्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये ठेवलेले तुरीचे पोते व एका शेतकऱ्याची म्हैस चोरीस गेली आहे.वाहनाच्या टायरच्या खुणा त्या शेतामध्ये आहेत अशी माहिती नळदुर्ग पोलीस स्टेशनला गेली असता पोलिसांनी तपासाचे सूत्रे त्या मालवाहतूक टेम्पोच्या च दिशेने वळवलीअसना त्यांनी आम्ही सध्या लातूरमध्ये आहोत असे सांगीतले असता नळदुर्ग पोलीसानी ताना मुद्दे मला सह परत नळदुर्गला येण्याची तंबी दिल्या वरून ते मुद्देमाला सगट नळदुर्ग पोलीस ठाणे येथे हजर झाले आणि त्यांनी चोरीची कबुली दिली असता नळदुर्ग पोलीस त्यांच्यावर गुन्हा दाखल करून सदर प्रकरणाचे सखोल चौकशी सुरू केली आहे.



या चोरीच्या पाठीमागील एखादा गुप्तहेर नेमका कोण हंगरगा येथील नातेवाईकांनी पोलिसांना खोटी माहिती का दिली वागदरीतील एखादा गुप्तहेर या चोराचा साथीदार आहे का आसी चौफेर चौकशी होऊन या चोरी मागेन मुख्य सूत्रधार व चोरटे आणि या चोरांना साथ असलेले त्यांचे साथीदार यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थातून होत आहे. कारण यापूर्वीही त्याच शेतकऱ्याच्या शेड मधून सोयाबीन चीरीस गेले होते. त्याचप्रमाणे वागदरीतील माजी सरपंच ज्ञानेश्वर किसन पाटील यांच्या शेतातील पत्र्याच्या शेड मधून ३० पोते सोयाबीन व विजयकुमार पाटील यांची शेतात बांधलेली गाय,नुकतेच शरद पवार, बाळू पवार,रामचंद्र यादव यांच्या घरात घुसून रोख रक्कम व सोन्याची दागीने अज्ञात चोरट्याने चोरी केल्याच्या घटना वागदरी गावात व शिवारात घडलेल्या आहत.या चोरी प्रकरणात ही या चोरांचा संबध येतो का ? याचा तपास पोलीसानी करावा अशी मागणी ग्रामस्थातून होत असून.नळदुर्ग पोलीसानी केलेल्या या कामगीरी बद्दल सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## शाळेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी शरणबसपा मुळजे व उपाध्यक्ष गायकवाड यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शाळेय व्यवस्थापन समीती अध्यश पदी शरणबसपा मुळजे व उपाध्यक्ष पदी श्रावण गायकवाड यांची निवड करण्यात आले सदर पालक सभेच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे हे होते.

सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजन मान्यवाराच्या हस्ते करून सभेस सुरुवात झाले यावेळी पहिलीते सातवी वर्गातील आरक्षण वर्गवारी प्रमाणे सदस्य निवडण्यात आले.

सदर निवडीच्या अध्यक्ष उपाध्यक्ष यांचे अभिनंदन वनिता सुरवसे, सरपंच, कमलाकर सोनकांबळे, उपसरपंच, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप यासह अनेक मान्यवर अभिनंदन करून शुभेच्छा दिले.

सभेची नियोजन मुख्याध्यापक पूडलिंक वाघमारे, शंकर करभारी, भोसले मॅडम यांनी केले.

# मकरसंक्रांत निमित्त महिला भाविकांच्या दर्शनासाठी सुलभ नियोजन

## पुरुष भाविकांनी मुखदर्शन घ्यावे, मंदिर समिती कडून आवाहन : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरामध्ये प्रतिवर्षी प्रमाणे परंपरेनुसार मकरसंक्रांत उत्सव साजरा करण्यात येत आहे. मकरसंक्रांतीच्या उत्सवानिमित्त भोगी ला म्हणजे दिनांक १३ जानेवारी रोजी श्री रूक्मिणी मातेची काकडा आरती व नित्यपूजा पहाटे ३.०० ते ४.३० या वेळेत करण्यात येणार असून, माता व भगिनींना श्री रूक्मिणी मातेस भोगी करावयाची असेल, त्यांनी मंदिरामध्ये पहाटे ४.३० ते ५.३० या वेळेत करावी. त्यादिवशी पहाटे ५.३० नंतर श्री रूक्मिणी मातेस पोषाख व अलंकार परिधान करण्यात येतील व सकाळी ०६.३० वाजेपर्यंत दर्शन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी



राजेंद्र शेळके यांनी दिली.

भाविकांच्या सोईच्या दृष्टीने दिनांक १३ जानेवारी रोजी श्री विठ्ठलाकडील काकडा आरती व नित्यपूजा पहाटे ४.३० ते ५.४५ या वेळेत होऊन, पदस्पर्श दर्शन पहाटे ०६.०० नंतर सुरू करणेत येणार आहे. दिनांक १४ जानेवारी रोजी नेहमीच्या वेळेमध्ये मकरसंक्रांती निमित्त श्री रूक्मिणी मातेची काकडा आरती व नित्यपूजा झालेनंतर श्री रूक्मिणी मातेस अलंकार परिधान केलेनंतर दर्शन सुरू करण्यात येणार आहे. तसेच दि.१५ जानेवारी रोजी नेहमीप्रमाणे श्री रूक्मिणी मातेची काकडा आरती व नित्यपूजा नेहमीच्या वेळेत करण्यात येणार असून, दिनांक १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांती निमित्त जास्तीत जास्त माता व भगिनींना श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे दर्शन सुलभ व्हावे, याकरीता पुरूष भाविकांनी शक्यतो मुखदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिरे समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

या कालावधीत भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन, दर्शनरांग व्यवस्थापन, कमांडोज नियुक्ती, टोकन दर्शन बुकींग व्यवस्था बंद, चांगली स्वच्छता व्यवस्था, व्हिआयपी दर्शनावर निर्बंध, पुजेची संख्या कमी करून भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सदरचा उत्सव मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर तसेच सर्व सदस्य महोदयांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात येत असल्याचे प्र. व्यवस्थापक संदेश भोसले यांनी यावेळी सांगीतले.

# तांदुळवाडी जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे १० जानेवारी रोजी आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याचे उद्घाटन शालेय समितीचे अध्यक्ष श्री माधवराव पाटील आणि उपसरपंच श्री. महावीर डिकले शाळेचे मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीत भर घालण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी ने या उपक्रमाचे आयोजन केले होते.या उपक्रमांतर्गत शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपापल्या शेतातील पिकवत असलेल्या विविध फळे,भाजीपाला तसेच इतर वस्तू विक्रीस ठेवल्या होत्या. यामध्ये चिक्कू, बोरे, पेरू,ऊस यासह विविध फळे आणि मेथी, चुका,शेपू,वाटाण्याच्या शेंगा तसेच विविध भाजीपाला विक्रीस ठेवण्यात आला होता. त्याचबरोबर काही विद्यार्थ्यांनी संक्राती निमित्त महिलांना लुटण्यासाठी च्या विविध वस्तू विक्रीस ठेवल्या होत्या.

मेळाव्यातील वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे खाऊ गल्ली! या ठिकाणी विद्यार्थ्यांनी व पालकांनी स्वतः तयार केलेले



वेगवेगळे पदार्थ विक्रीस ठेवले होते. गावातील तरुण युवक युवती व वृद्ध आणि पालक मंडळींनी या खाऊ गल्लीला भेट देत वडापाव, पावभाजी, इडली सांबर,समोसे, भेळ, रगडा , पाणी पुरी,पॅटीस अशा विविध खाद्यपदार्थावर ताव मारला. गावातील भगिनींनी मकर संक्रांति निमित्त खरेदी करावयाच्या विविध वस्तू आणि भाजीपाला व फळे यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली.

आनंददायी मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सहशिक्षक श्री संतोष मोहिते, श्री सयाजी शिंदे, श्रीमती रसिका आगरकर, आशा पवार तसेच स्वयंपाकी कर्मचारी सौ रुक्मिणी डिकले व मयुरी डिकले यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळेतील या आनंद मेळाव्याला शालेय शिक्षण समितीचे सर्व सदस्य, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, कर्मचारी, गावातील अंगणवाडी कार्यकर्ती,मदतनीस, आशा कार्यकर्ती आणि गावातील तरुण, वृद्ध, युवक ,युती, महिला या सर्वांनीच भेट देऊन या आनंददायी मेळाव्याचा आनंद घेतला. यामधून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले वेगवेगळे भाव तसेच बाजारात एखादी वस्तू विक्री करावयाची असल्यास करण्याची जाहिरात, आर्थिक व्यवहाराची देवघेव याबाबत विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण झाल्याचे दिसून आले.

## प्रभाग क्रमांक १२३ चे महायुतीचे उमेदवार अनिल निर्मळे यांच्या प्रचारार्थ डॉ. प्रितम मुंडे यांचा नागरिकांशी घरोघरी जाऊन संवाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : प्रभाग क्रमांक १२३ चे भाजप शिवसेना रिपाई महायुतीचे अधिकृत उमेदवार अनिल निर्मळे यांच्या प्रचारार्थ बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी महायुतीचे उमेदवार अनिल निर्मळे यांच्या समवेत प्रभाग क्रमांक १२३ मधील नागरिकांच्या घरोघरी जाऊन डोअर टू डोअर संवाद साधून भारतीय जनता पार्टी आणि महायुतीचे उमेदवार अनिल निर्मळे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

### अनिल निर्मळे यांना विजयी करण्याचे आवाहन

तसेच यावेळी डॉ.प्रितम मुंडे यांनी प्रभागातील मतदार नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या सोबत मुंबई भाजप सचिव प्रतिक कर्पे, मंडळ अध्यक्ष संतोष गांजले, शिवसेना शाखाप्रमुख सुनील सोडा, वॉर्ड अध्यक्ष महेश गुप्ता, शिवसेना समन्वयक मंगेश मोहिते आणि महायुतीचे स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरामणी येथे शिवसेनेचे धनेश आ चला रे यांच्या जनसंपर्क कार्यालयाची काशी पीठ सद्गुरूंच्या हस्ते उद्घाटन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथे शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा उपप्रमुख गणेश आचलारे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन काशी पिठाचे जगद्गुरु डॉक्टर श्री मल्लिकार्जुन विश्वराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आले.

बोरामणी पंचायत समितीचे माजी सदस्य धनेश आचलारे हे गेल्या वीस वर्षापासून राजकीय आणि सामाजिक जीवनात कार्यरत आहेत. शेतकरी युवक आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांना संपर्क साधण्यासाठी संपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे त्यांचे उद्घाटन काशी पिठाचे जगद्गुरु डॉक्टर मल्लिकार्जुन विश्वराया शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी गृहमंत्री सिद्राम म्हेत्रे उपस्थित होते.

यावेळी काशी जगद्गुरुंनी शिवसेना नेते धनेश आचलारे यांना आशीर्वाद देत त्यांच्या सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व यावेळी माझी मंत्री सिद्राम म्हेत्रे यांनी बोरामणीकरांना धनेश असणारी यांचे हात बळकट करावीत, असे आव्हान केले यावेळी या कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कामर पाटील, मनीष काळंजे, अमोल शिंदे दुधनीचे नगराध्यक्ष प्रथमेश मेहेत्रे, महिला जिल्हाप्रमुख रवीना राठोड तालुकाप्रमुख बाबासाहेब पाटील, योगीराज पाटील यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व बोरामणी गटातील नेतेमंडळी व मतदार बंधू मित्रपरिवार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भारुडकार दिनकर कदम यांनी केले समाज प्रबोधन

# वागदरी श्रमसंस्कार शिबिरात भारुड पोवाडे जलसा लोकगीतांचा कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालमय तबला, सुरात वाजणारी पेटी, खणखणीत वाजवणारे टाळ आणि दाद देणारे रसिक त्यातून प्रबोधनपर भारुड, पोवाडे, विनोदी जलसे, बहारदार लोकगीते यामुळे श्रमसंस्कार शिबिरातील वातावरण पुरते रसिकमय झाले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिर सध्या वागदरी येथे सुरू आहे. या शिबिराच्या प्रसंगी ग्रामस्थांचे भारुड, नाट्य, जलसा, पोवाडे या माध्यमातून समाजप्रबोधन करण्यासाठी भारुडकार दिनकर कदम यांचा कार्यक्रम कल्याणशेट्टी




महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बसवराज शेळके, राजश्री शेळके, बा .ना. चव्हाण, प्रा प्रदीप पाटील, प्रा भीम सोनकांबळे, प्रा सोनाली कटकधोंड, प्रा ओंकार घिवारे उपस्थित होते.

भारुडकार दिनकर कदम यांनी जलसा, गाणी, नृत्य, संवाद, विनोद आणि प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून अंधश्रद्धानिर्मूलन, व्यसनमुक्ती, स्त्री-सक्षमीकरण, स्वच्छता, मतदानाचे महत्त्व असे विषय प्रभावीपणे मांडले करमणूक आणि प्रबोधन यांचा समतोल साधला. सामाजिक अन्याय, जातिभेद, स्त्रियांचे प्रश्न, शिक्षण, गरिबी अशा विषयांवर नाटके सादर केली. कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी आधुनिक काळातील सामाजिक विषयांवर पोवाडे सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले लोकगीतांमधून ग्रामीण जीवन, श्रमसंस्कृती, स्त्रियांचे प्रश्न, सामाजिक भावना व्यक्त केल्या. ही गीते समाजाला एकत्र आणण्याचे कार्य करतात असे शेवटी कदम यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी केले आभार समर्थ पवार यांनी मानले.

# शिवपुर येथील प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी प्रतिनिधी/ हनुमंत पाटुळे : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील शिवपुर वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १० जानेवारी २०२५ रोजी सकाळी शाळेतील मुलांना आर्थिक व्यवहाराचे ज्ञान मिळावे या उद्देशाने शाळेच्या वतीने बाल आनंद मेळावा भरवण्यात आला होता. या मेळाव्यात मुलांनी वेगवेगळे खाद्यपदार्थ समोसे, वडापाव, पावभाजी, पोहे, चॉकलेट, आदी सह जनरल स्टोअर, पालेभाज्या असे वेगवेगळे स्टोअर मांडले होते. या बाल आनंद मेळाव्याचा आनंद घेण्यासाठी गावातील नागरिक पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहून खरेदी करत होते. यामुळे मुलांना खूप आनंद होत होता. या बाल आनंद मेळाव्याला बाजाराचे स्वरूप आले होते. या बाल आनंद मेळाव्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश नरसिंगे , शिक्षक अनिल बाबर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश मिसाळ व शाळा व्यवस्थापन समितीच्या व सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले होते .

या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन शिवाजी बोबडे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. गावचे सरपंच अमोल पाटील यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले.

यावेळी उपसरपंच दयानंद पाटील, माजी उपसरपंच किरण पाटील, जिल्हा परिषद प्रशाला शाळेचे मुख्याध्यापक रामचंद्र पवार , गणेश मिसाळ, बालाजी चौरे, विकास बंडगर, गोपाळ शेळके, अमोल सोनटक्के दशरथ शेळके, दीपक सावंत यांच्या सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सैनिक स्कूलच्या सार्थक चव्हाणची राष्ट्रीय सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पर्धेत निवड, तर संघाचा चौथा क्रमांक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी सार्थक नारायण चव्हाण यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राष्ट्रीय सॉफ्टबॉल अजिंक्य स्पर्धेत निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशन च्या वतीने घेण्यात आलेल्या ३१ वी सब ज्युनिअर राज्य सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पर्धा (मुले व मुली) सन-२०२५-२६ चे आयोजन दि. २६ ते २८ डिसेंबर २०२५ दरम्यान राजे छत्रपती शिवाजी पब्लिक हायस्कूल , हरणमाला जि. धुळे जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशन मार्फत करण्यात आले होते.

सदर स्पर्धेत आपल्या विद्यालयातील मुलांच्या संघाचा सहभाग होता. या स्पर्धेत आपल्या विद्यालयातील संघाचा चोथा क्रमांक आला . तसेच आपल्या संघातील सार्थक नारायण चव्हाण या विद्यार्थ्याने स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्याचे हरीयाणा येथे होणाऱ्या सब ज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पधेत निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन दि. ०८ ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान करण्यात आलेले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे श्रीमती माया माने मॅडम तहसीलदार तथा व्यवस्थापक प्रशासन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर तसेच विद्यालयाचे प्राचार्य श्रीमान घोडके सर यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला . सदरील विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य श्रीमान घोडके सर यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व क्रीडा शिक्षक, यांचे मार्गदर्शन लाभले श्री बिलकुले सर, श्री माने सर, श्री काटंबे सर, श्री रेनके सर, श्री रोहित घोडके सर इत्यादींचे मार्गदर्शन लाभले . विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# श्री सिद्धरामेश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर मिरवणूक मार्ग व होम मैदानाची महापालिका आयुक्तांकडून पाहणी

## मनपा आयुक्तांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिल्या विविध सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहरात भाविकांच्या श्रद्धेने आणि उत्साहात साजरी होणाऱ्या श्री सिद्धरामेश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज यात्रेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या होम मैदानासह नंदी ध्वज मिरवणूक मार्गाची सखोल पाहणी केली.

या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, राजशेखर हिरेहब्बू, नगर अभियंता सारिका आकूलवार, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, मनोज जाधव, सागर करोसेकर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



यात्रेदरम्यान भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये तसेच नंदी ध्वज मिरवणूक सुरक्षित व सुरळीत पार पडावी, यासाठी आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी संबंधित विभागांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. मिरवणूक मार्गावरील अडथळा निर्माण करणाऱ्या झाडांच्या फांद्या तात्काळ काढून टाकण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून उंच नंदी ध्वज व मिरवणुकीला कोणताही अडथळा येऊ नये.

तसेच मिरवणूक मार्गावरील लटकणाऱ्या केबल वायर, दूरध्वनी व विद्युत तारा सुरक्षित पद्धतीने दुरुस्त अथवा स्थलांतरित करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना देण्यात आले. यात्रेच्या काळात रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशयोजना राहावी यासाठी एलईडी लाईट्स व अतिरिक्त प्रकाश व्यवस्था उभारण्याबाबत तसेच बंद किंवा खराब असलेल्या दिव्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याचे निर्देशही देण्यात आले.

मिरवणूक मार्गावरील खड्डे, रस्त्यांची दुरवस्था व आवश्यक ठिकाणी रस्ते दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करावीत, जेणेकरून भाविक, वाहनचालक व मिरवणुकीतील सहभागी यांना कोणताही धोका निर्माण होणार नाही, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

होम मैदान परिसरात होणाऱ्या धार्मिक विधी व कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता, पिण्याचे पाणी, तात्पुरती शौचालये, विद्युत पुरवठा, आरोग्य सुविधा व अग्निशमन यंत्रणेची सज्जता याबाबतही आयुक्तांनी पाहणी करून आवश्यक त्या सुधारणा करण्याचे निर्देश दिले.

यात्रेच्या कालावधीत स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत, उद्यान, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, अग्निशमन दल, वाहतूक पोलीस व पोलीस प्रशासन यांनी परस्पर समन्वयाने काम करून यात्रेचे नियोजन यशस्वी करावे, असे निर्देश आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

सोलापूर महानगरपालिका श्री सिद्धरामेश्वर यात्रेसाठी सर्वतोपरी तयारी करत असून भाविकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# मराठी पत्रकारितेने लोकशाही सशक्त केली : शिवाजी शिंदे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात प्रसिद्धी व फोटो समिती, राष्ट्रीय सेवा योजना समिती व इंटायर मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी पत्रकार दिन समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास दै. पंढरी भूषणचे संपादक शिवाजी शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव होते.

यावेळी मंचावर वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य तथा अधिष्ठाता डॉ. सुशीलकुमार शिंदे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे प्रमुख समन्वयक डॉ. अमर कांबळे, कला विभागाचे अधिष्ठाता डॉ. समाधान माने, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी डॉ. दत्तात्रय चौधरी, दै. पुण्यनगरीचे सतीश बागल आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रसिद्धी व फोटो समितीचे प्रमुख डॉ. दत्तात्रय डांगे यांनी केले, तर प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांचा परिचय प्रा. बालाजी फुगारे यांनी करून दिला.

पत्रकारिता: काल, आज आणि उद्या या विषयावर मार्गदर्शन करताना शिवाजी शिंदे म्हणाले की, भारतासारख्या लोकशाही देशाला पत्रकारितेची उज्ज्वल परंपरा लाभलेली आहे. स्वातंत्र्यलढ्यापासून ते विविध सामाजिक चळवळींपर्यंत पत्रकारितेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. राजकीय दबाव, आव्हाने असूनही पत्रकारितेने कधीही सत्याशी तडजोड केली नाही. आज सोशल मीडियाच्या काळात बातम्यांमधून नेरिटिव्ह तयार करून समाजमन घडवले जात आहे, ही बाब धोकादायक असून पत्रकारांनी याला बळी न पडता बातमीमागील सत्य समाजासमोर आणणे आवश्यक आहे. बदलत्या सामाजिक, आर्थिक व तांत्रिक परिस्थितीत विश्लेषणात्मक पत्रकारितेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात मराठी पत्रकार दिन साजरा**

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव म्हणाले की, 'मराठी पत्रकारितेला मोठा आणि गौरवशाली इतिहास आहे. पत्रकारिता ही संभ्रम निर्माण करणारी नसून समाजाला अचूक, वस्तुनिष्ठ आणि पुरेशी माहिती देणारी असावी. पत्रकारांच्या लेखणीचा समाजमनावर मोठा प्रभाव असतो, त्यामुळे बातमीत प्रामाणिकपणा व वास्तवता असली पाहिजे. शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक यांच्या समस्या मांडून त्यांना योग्य दिशा देण्याचे काम पत्रकारांनी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात विविध वर्तमानपत्रांचे संपादक, सहसंपादक, निवासी संपादक, उपसंपादक, वार्ताहर तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियाचे संपादक, कॅमेरामन, निवेदक यांचा मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प, पेन व डायरी देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार प्रशांत वाघमारे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी चाळीसहून अधिक वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सीनियर विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल डॉ. विनया पाटील, प्रा. राजेंद्र मोरे, प्रा. संदीप बागल, प्रा. नितीन कांबळे, प्रा. दत्तात्रय खिलारे, अभिजित जाधव, अमोल माने, समाधान बोंगे व ओंकार नेहतराव यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस अभिवादन करून झाली. सूत्रसंचालन प्रा. मोहिनी सावंत यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. धनंजय वाघदरे यांनी केले.

# कळंब येथे नगराध्यक्ष सुनंदा कापसे यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. सुनंदा शिवाजी कापसे यांचा सत्कार कळंब शहर विकास कृती संघर्ष समिती, यांच्या वतीने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा व पुष्पगुच्छ भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी समितीचे पदाधिकारी सतपाल बनसोडे, संतोष भांडे, अनिल हजारे, बाळासाहेब कथले, राकेश कोमटवार, सचिन वाघमारे, बापू कदम यांच्या सह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# अनेक वर्षांच्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांची अखेर विल्हेवाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब शहरातील कचरा व्यवस्थापनाची समस्या गेल्या अनेक वर्षांपासून गंभीर स्वरूपाची बनली होती. शहरातील विविध भागांमध्ये नियमित स्वच्छतेअभावी कचऱ्याचे मोठमोठे ढीग साचले होते. यामुळे नागरिकांचे आरोग्य, पर्यावरण आणि शहराची एकूण प्रतिमा धोक्यात येत होती. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा सौ. सुनंदा शिवाजी कापसे यांनी परिस्थितीची दखल घेत थेट कृतीचा मार्ग स्वीकारला आहे.



नगराध्यक्षा सौ. सुनंदा कापसे या केवळ कार्यालयात बसून आदेश देणाऱ्या नगराध्यक्षा न राहता, जे सी बी सोबत स्वतः रस्त्यावर उतरून अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांची साफसफाई सुरू केली. विशेषतः प्रभाग क्रमांक ०७ मधील अनेक ठिकाणी साचलेला जुना कचरा हटवण्याचे काम प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने सुरू करण्यात आले.

या स्वच्छता मोहिमेमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, अखेर आमच्या भागातही स्वच्छतेला सुरुवात झाली अशा प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहेत. अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या भागांना नवसंजीवनी मिळत असल्याची भावना नागरिकांमध्ये दिसून येत आहे.

**नगराध्यक्षा सुनंदा कापसे जेसीबी घेऊन थेट रस्त्यावर स्वच्छतेला गती**

या स्वच्छता अभियानाच्या वेळी प्रभाग क्रमांक ०७ चे नगरसेवक अमर चाऊस, नगरसेविका पूजा धोकटे तसेच मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वयातून कळंब शहर स्वच्छतेकडे एक ठोस पाऊल टाकत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

नगराध्यक्षा सौ. सुनंदा कापसे यांच्या या कार्यतत्पर आणि ठाम भूमिकेमुळे कळंब शहरातील स्वच्छता व्यवस्थेला नवसंजीवनी मिळणार असून, स्वच्छ शहर सुंदर शहर ही संकल्पना केवळ घोषणे पुरती न राहता प्रत्यक्षात उतरत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

**तेरणा इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्रांगणात धाराशिव जिल्हा भाजपाच्या वतीने धाराशिव येथे संवाद मेळाव्याचे आयोजन**

# विकासात्मक मुद्द्यावर आपण होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका संपूर्ण ताकदिनीशी लढविणार : आ. राणा दादा पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : भारतीय जनता पार्टी च्या वतीने महायुतीच्याच माध्यमातून आपण होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांमध्ये धाराशिव जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद गटातून आणि पंचायत समिती गणातून विकासात्मक मुद्यावर आणि कार्यकर्त्यांच्या बळावर संपूर्ण ताकदीनिशी निवडणुका लढविणार असून कार्यकर्त्यांनी संपूर्ण तयारीनिशी या निवडणुकीला सामोरे जाण्याचा प्रयत्न करावा व धाराशिव जिल्हा परिषदेमध्ये भाजपा महायुतीची सत्ता प्रस्थापित करावी असे आवाहन तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा धाराशिव जिल्ह्याचे भाजपा नेते माजी मंत्री आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी धाराशिव येथे आयोजित कार्यकर्ता संवाद मेळाव्यात बोलताना केले.



धाराशिव जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद गटातून व पंचायत समिती गणातून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या भाजपा कार्यकर्त्यांचा येथील तेरणा इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्रांगणात धाराशिव जिल्हा भाजपाच्या वतीने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना लोकप्रिय आमदार राणाजगजीतसिंह पाटील बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की केंद्रात आणि राज्यात भाजपा व मित्र पक्ष महायुतीची सत्ता असून नुकतंच पार पडलेल्या नगर परिषदा निवडणुकीत ही भाजपा महायुतीचेच प्राबल्य दिसून आलेले आहे. धाराशिव जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नातूनच आपण फार मोठे यश संपादन केले आहे. त्याच धर्तीवर आपण आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नातून ही निवडणूक विकासात्मक मुद्द्यावर संपूर्ण ताकतिनीशी लढविणार असून कार्यकर्त्यांनी केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या माध्यमातून सबके साथ सबका विकास सबका विश्वास आणि सबका प्रयास या तत्त्वावर होत देशात राज्यात आणि जिल्ह्यात होत असलेल्या विकासात्मक कामाचे मुद्दे घेऊन जनतेसमोर जायचं आहे एकमेकांवर टीका टिप्पणी करण्यापेक्षा होत असलेल्या आणि हो पुढे होणाऱ्या विकासात्मक कामाच्या मुद्यावर आपण ही निवडणूक लढवायची आहे.

या प्रसंगी भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते सुरेश देशमुख, जिल्हा अध्यक्ष दाताभाऊ कूलकर्णी, माजी जिल्हा अध्यक्ष नितीन काळे, युवा नेते शरण पाटील आदींची ही भाषणे झाली.

या प्रसंगी नळदुर्ग न.प. चे नगराध्यक्ष बसवराजआप्पा धरणे, तुळजापूर नगराध्यक्ष पिटू भैया गंगणे, सह जिल्ह्यातील जि.प. गरातून व प.स. गणातून भाजपा च्या वतीने निवडूक लढविण्यास इच्छुक असलेले सर्व इच्छूक उमेदवार, पाधाधिकारी कार्यकर्ते, युवा कार्यकर्ते मोठ्य संख्येने उपस्थित हाते.